## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १४ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे प्रशाळेतील डॉ. आंबेडकर विचारधारा विभागाच्या वतीने दि. १४ नोव्हेंबर रोजी सुभेदार रामजी सकपाळ यांच्या जयंतीनिमित्त प्रा. राकेश रामटेके यांचे विशेष व्याख्यान झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील सुभेदार रामजी सकपाळ हे भारतीय लष्करात सुभेदार या होते. त्यामुळे इंग्रजी शिक्षण आणि शिक्षणाचे महत्त्व ते जाणून होते. त्यामुळे त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षणाचा आग्रह धरला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांना शिकवण्याचे काम सुभेदार रामजी सकपाळ यांनी केले. सुभेदार रामजी सकपाळ हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीमध्ये कार्य करीत असल्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटले होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना घडविण्यात सुभेदार रामजी सकपाळ यांचे फार मोठे योगदान राहिले आहे. एक आदर्श पिता म्हणून रामजी सकपाळ यांच्याकडे पाहिले जाते, असे प्रतिपादन प्रा राकेश रामटेके यांनी केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. उमेश गोघाडिया, अर्थशास्त्र विभागातील डॉ. अभय मनसरे, विनेश पावरा, रोशन मावळे, प्रा. मोईन शेख, महाले, तथागत सुरवाडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन डॉ. विजय घोरपडे यांनी केले तर विद्यार्थिनी सुकन्या जाधव हिने आभार मानले.

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १४ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी